डोणगावची 'गुगल गर्ल' कोमल खनपटेचा सत्कार >>पान 2

आर्थिक प्रगतीबरोबरच कला, क्रीडा आणि साहित्य क्षेत्रातील प्रगतीही महत्त्वाची- मंत्री चंद्रकांत पाटील >>पान 3

माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर यांची पुण्यात पाहणी >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ


apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 212 ■ गुरूवार, दि. 12 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

व्यवहारात आपण दुसऱ्याची लबाडी ओळखून वागावे, एवढीच लबाडी आपल्यामध्ये असावी. – अज्ञात



अक्षय कुमारच्या भूतबंगला चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित, टीझर गुरुवारी प्रदर्शित होणार

आतील पान

# गेल्या १२ दिवसांपासून अमेरिका-इस्त्रायलकडून हल्ले

## इराणचा एक प्लॅन समोर येताच डोनाल्ड ट्रम्पही चक्रावले



**तेहरान/वृत्तसंस्था :** सलग १२ व्या दिवशीही आखाती युद्ध सुरूच आहे. इराणवर अमेरिका आणि इस्रायलकडून वारंवार हल्ले करण्यात येत आहे. तर इराणकडून पलटवार सुरु आहे. या युद्धात आतापर्यंत २००० जणांचा मृत्यू झाला असून हजारो नागरिक जखमी झाले आहेत. दरम्याम, एकीकडून अमेरिका-इस्त्रायलकडून हल्ले सुरु असताना इराणचा एक प्लॅन समोर आला. इराणचा होर्मुझच्या सामुद्रधुनीतील हा प्लॅन ऐकून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पही चक्रावले.

होर्मुझच्या सामुद्रधुनीत इराणकडून स्फोटके तैनात करण्यात आले आहेत. स्फोटकांचं वृत्त ऐकून डोनाल्ड ट्रम्प यांनी संताप व्यक्त केला. इराणनं स्फोटकं हटवावी अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला. तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीतील स्फोटकं न हटवल्यास इराणवर अभूतपूर्व हल्ला करणार असल्याचं देखील डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. दरम्यान, अमेरिकन सैन्याने होर्मुझच्या सामुद्रधुनीत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीत दारूगोळा भरलेली १६ जहाजे उद्ध्वस्त केली.

२०२५ मध्ये इराण-इस्त्रायल युद्ध आणि इराण समर्थित गटांशी झालेल्या संघर्षांमुळे इस्त्रायच्या नेत्यांनी जानेवारीमध्ये इराणला वारंवार इशारा दिला होता की, ते त्यांच्या अण्वस्त्र कार्यक्रम आणि क्षेपणास्त्र क्षमतांचा अनियंत्रित विस्तार करू देणार नाहीत. परंतु, इराणने अशा कोणत्याही गोष्टींना जुमानले नाही. इराणने आपला संवेदनशील अण्वस्त्र कार्यक्रम आणि क्षेपणास्त्र संबंधित प्रक्रिया सुरूच ठेवल्या. अनेकदा इशारे देऊनही इराण थांबत नाही, असे दिसताच इस्रायल आणि अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानवर हल्ला चढवला, ज्यामुळे मध्य पूर्वेत पुन्हा एकदा तणाव निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे.

इराण हा जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांपैकी एक आहे. युद्ध अधिक भडकल्यास, पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. याचा परिणाम कच्च्या तेलाच्या किमतीवर होऊन, त्यात मोठ्या प्रमाणावर वाढ होऊ शकते. जर हा संघर्ष अधिक चिघळला, तर कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम दिसू शकतो. जर किमतीत मोठी वाढ झाली तर पेट्रोल आणि डिझेलच्या दरातही वाढ होऊ शकते. तसेच, येणाऱ्या काही आठवड्यांत बाजारात मोठी अस्थिरता आणि चढ-उतार पाहायला मिळतील, असाही अंदाज तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे सोने आणि चांदी महाग होतील. युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण होते. गुंतवणूकदार पैसे शेअर बाजारातून काढून सोने आणि चांदीमध्ये गुंतवतात. यामुळे सोने आणि चांदीच्या किंमती ऐतिहासिक पातळीवर जाऊ शकतात.

## गॅस तुटवड्याचा हॉटेल व्यवसायावर परिणाम; चुलीवर स्वयंपाक



**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता स्थानिक व्यवसायांवरही दिसू लागला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा खंडित झाल्यामुळे हॉटेल व्यवसायिकांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे.

गॅस उपलब्ध नसल्यामुळे काही हॉटेल मालकांना पर्याय म्हणून लाकडाच्या चुलीवर स्वयंपाक करून व्यवसाय सुरू ठेवण्याची वेळ आली आहे. ग्राहकांची गैरसोय होऊ नये म्हणून हॉटेल चालक लाकडाच्या चुलीवर पदार्थ तयार करून विक्री करत असल्याचे हॉटेल मालक प्रवीण तवर यांनी सांगितले. दरम्यान, गॅसचा तुटवडा असल्यामुळे पदार्थ तयार होण्यासाठी जास्त वेळ लागत असल्याचेही हॉटेल व्यावसायिकांचे म्हणणे आहे. नियमित येणाऱ्या ग्राहकांनीही यामुळे सेवा उशिरा मिळत असल्याचे सांगितले असून सरकारने लवकरात लवकर कमर्शियल गॅसचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे.

## विमानसेवा सुरू असताना ड्रोन हल्ला, एका भारतीयासह चार जण जखमी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जगातील सर्वात व्यस्त विमानतळांपैकी एक असलेल्या दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ आज पुन्हा दोन ड्रोन कोसळल्याने एकच खळबळ उडाली. दुबई विमानतळावरून विमान सेवा सुरू असतानाच ही घटना घडल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून यात एका भारतीय नागरिकासह एकूण चार जण जखमी झाले आहेत.





## ई-चलान वसुलीसाठी सक्ती केल्यास पोलिसांवरच होणार कारवाई

### पोलीस महासंचालकांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** रस्त्यावरील वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यानंतर आकारल्या जाणाऱ्या 'ई-चलान'च्या दंडाची वसुली करताना वाहनचालकांशी उद्धटपणे वागणे आणि दंड भरण्यासाठी सक्ती करणे आता पोलिसांना महागात पडणार आहे. प्रलंबित दंड भरण्यासाठी वाहनचालकांवर कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करू नये, असे स्पष्ट निर्देश अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांनी राज्यातील सर्व पोलीस घटकांना दिले आहेत. या सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आता थेट शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यात प्रलंबित ई-चलान वसुलीसाठी वाहतूक पोलिसांकडून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे.




मात्र, या मोहिमेदरम्यान अनेक ठिकाणी पोलीस वाहनचालकांना रस्त्यात अडवून 'दंड आत्ताच भरा, अन्यथा वाहन किंवा कागदपत्रे जप्त करू' अशी दमदाटी करत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. या पार्श्वभूमीवर गृह विभागाने या प्रकाराची गंभीर दखल घेतली आहे. परिवहन मंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत पोलिसांच्या या वर्तनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली होती.

वाहतूक विभागाने ई-चलान दंड वसुलीसाठी यापूर्वीच 'आदर्श कार्यप्रणाली' (एसओपी) जाहीर केली आहे. यानुसार, जर वाहनचालक स्वेच्छेने दंड भरण्यास तयार असेल, तरच तो स्वीकारावा. वाहन जप्तीसारखी कारवाई केवळ न्यायालयाच्या आदेशानेच करण्यात यावी. रस्त्यात वाहनचालकांना अडवून त्यांच्याशी उद्धटपणे बोलू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

ग्राउंडवर काम करणारे पोलीस कर्मचारी अनेकदा वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करून जनतेला नाहक त्रास देत असल्याचे समोर आले आहे. यामुळे पोलिसांची जनमानसातील प्रतिमा मलिन होत असल्याचे नव्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

जे पोलीस अधिकारी किंवा अंमलदार या निर्देशांचे उल्लंघन करतील, त्यांच्याविरुद्ध तत्काळ शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## राज्यपाल वर्मा यांचे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन, चैत्यभूमी तसेच सावरकर स्मारक येथे देखील भेट

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यपाल पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पहिल्या दिवशी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी बुधवारी दादर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी महापौर रितू तावडे देखील उपस्थित होत्या.राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी त्यानंतर चैत्यभूमी येथे जाऊन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना अभिवादन केले. यावेळी राज्यपालांच्या उपस्थितीत त्रिशरण बुद्ध वंदना करण्यात आली.

मुंबईच्या महापौर रितू तावडे, भन्ते राहुल बोधी महाथेरो, डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे महासचिव नागसेन कांबळे यावेळी उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभेचे प्रताप कांबळे, भिकाजी कांबळे व प्रतीक कांबळे यांनी राज्यपालांना संविधानाची प्रत भेट दिली. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी मुंबई येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक येथे देखील भेट दिली व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.यावेळी मुंबईच्या महापौर रितू तावडे, माजी खासदार राहुल शेवाळे, स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजित सावरकर व खजिनदार मंजिरी मराठे उपस्थित होते. स्मारकाच्या वतीने राज्यपालांना सावरकरांची प्रतिमा तसेच सावरकर विषयी ग्रंथ भेट देण्यात आले.

# 'गुगल गर्ल' कोमल खनपटेचा विक्रम

## अफाट स्मरणशक्तीचा चमत्कार; बुलढाणा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

## १० सेकंदांत भारतातील सर्व राज्यांची नावे सांगत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद




**डोणगाव/विशेष प्रतिनिधी : मेहकर तालुक्यातील डोणगाव येथील कुमारी कोमल देविदास खनपटे हिने आपल्या विलक्षण बुद्धिमत्ता आणि स्मरणशक्तीच्या जोरावर 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नाव नोंदवत बुलढाणा जिल्ह्याचा गौरव वाढवला आहे. अवघ्या १० सेकंदांत भारतातील सर्व राज्यांची नावे अचूकपणे आणि सलग सांगण्याचा अनोखा विक्रम तिने प्रस्थापित केला आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे जिल्हाभरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून परिसरात तिला प्रेमाने 'गुगल गर्ल' म्हणून ओळख मिळू लागली आहे**

डोणगाव येथील श्री शिवाजी हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेणारी कोमल लहानपणापासूनच अभ्यासू, जिज्ञासू आणि सामान्य ज्ञानाची विशेष आवड असलेली विद्यार्थिनी आहे. वाचनाची सवय, नवीन विषय जाणून घेण्याची उत्सुकता आणि सातत्यपूर्ण अभ्यास यामुळेच तिने हा विक्रम गाठला आहे.




भारताच्या सर्व राज्यांची नावे अवघ्या १० सेकंदांत अचूकपणे उच्चारण्याचे कौशल्य तिने सिद्ध केले असून या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'ने तिच्या नावाची अधिकृत नोंद केली आहे. या सन्मानाबद्दल तिला प्रमाणपत्र, IBR पेन, रेकॉर्ड होल्डर ओळखपत्र, पुस्तकाची प्रत, IBR बॅज, "Medal of Achievement' पदक तसेच दोन IBR कार स्टिकर्स देऊन गौरविण्यात आले.




कोमलच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच गावकऱ्यांनी तिचे विशेष अभिनंदन केले आहे. कठोर परिश्रम, सातत्य आणि जिद्द असेल तर कोणतेही ध्येय गाठता येते, असे मत कोमलने व्यक्त केले.

विशेष म्हणजे, कोमलचे वडील देविदास खनपटे हे पत्रकार असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि घरातील शैक्षणिक वातावरणामुळे कोमलला लहानपणापासूनच सामान्य ज्ञानाची आवड निर्माण झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये दडलेली प्रतिभा योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास मोठे यश मिळवता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे कोमल देविदास खनपटे होय.

## बुडत्याचा पाय खोलात

बुडत्याचा पाय खोलात असे म्हणतात. म्हणजे एखादी व्यक्ती बुडायचीच असेल, तर तिला कसलाच आधार मिळत नाही आणि अखेरीस ती पूर्ण बुडून जाते, असा या उक्तीचा अर्थ. प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची अवस्था आता अशीच झाली आहे. मतांसाठी मुस्लीम तुष्टीकरणाचे जे राजकारण त्यांनी सुरू केले होते, त्यात त्यांचा पाय अधिकाधिक खोलात जात चालला आहे. सत्तेच्या लालसेपोटी आता त्यांनी थेट हिंदू समाजालाच धमकाविण्यास प्रारंभ केल्याचे दिसते. एका सभेत बोलताना ममता बॅनर्जी म्हणाल्या की, ''आम्ही (म्हणजे तृणमूल काँग्रेस पार्टी) सत्तेवर आहोत, म्हणूनच तुम्ही (हिंदू समाज) वाचला आहात. आम्हाला सत्तेवरून दूर केलेत, तर एक विशिष्ट समाज तुम्हाला घेरून संपवून टाकेल आणि त्याला एक सेकंदही लागणार नाही.'' अशाच तऱ्हेचे वक्तव्य यापूर्वी हैदराबादच्या 'एमआयएम' पक्षाचे नेते अकबरुद्दीन ओवेसी यांनी केले होते. ''पोलिसांना केवळ १५ मिनिटे दूर करा आणि मग बघा, आम्ही (मुस्लीम) काय करतो ते,'' या त्यांच्या वक्तव्याने तेव्हाही खळबळ माजविली होती. पोलीस संरक्षण नसेल, तर हिंदूंची कत्तल करण्यास मुस्लिमांना फारसा वेळ लागणार नाही, हेच त्यांना सूचित करायचे होते. अर्थात, त्यांच्या पक्षाचा उद्देशच मुस्लिमांची एकजूट आणि सत्ताप्राप्ती करणे, हा आहे. त्यामुळे त्यांचे हे वक्तव्य त्यांच्या विचारसरणीला अनुसरूनच आहे. या पक्षाचे अध्यक्ष व खासदार असदुद्दीन ओवेसी यांनीही नुकतेच म्हटले होते की, १९४७ पर्यंत भारताच्या पंतप्रधानपदी एखादी बुरखा घातलेली महिला बसलेली पाहणे, हे माझे स्वप्न आहे. एकंदरीतच स्वत:ला राज्यघटनेचे रक्षक आणि सेक्युलॅरिझमचे प्रवक्ते मानणाऱ्या नेत्यांना आता आपल्या विरोधातील मतदारांना संपविण्याची घाई झालेली आहे, असे दिसते. अशीच घाई आता ममता बॅनर्जींना झाली असावी. कारण ''हिंदूंना संपविण्यास या विशिष्ट समुदायाला एक सेकंदही लागणार नाही,'' असे त्यांनी म्हटले आहे. काही महिन्यांपूर्वी मुर्शिदाबाद येथे झालेल्या दंगलीत आणि बंगालमधील कोणत्याही निवडणुकांदरम्यान त्याचा अनुभव राज्यातील हिंदू समाजाला आलेला आहे. भारतातून हिंदूंना संपविण्याचे स्वप्न अनेक पाकिस्तानी दहशतवादी संघटना पाहात आहेत. पाकिस्तानच्या 'आयएसआय' या दहशतवादी गुप्तचर संस्थेने तर 'गझवा-ए-हिंद' नावाचा कटच आखला आहे. त्यानुसार भारतात मुस्लिमांची संख्या वाढवून बहुसंख्याकांइतकी करायची आणि भारतावर इस्लामी धर्मसत्ता स्थापन करायची, हा या त्यांच्या कटाचा उद्देश आहे. ममता बॅनर्जी यांचा त्या कटाला पाठिंबा आहे की काय, अशी शंका त्यांच्या या वक्तव्यावरून येते. ममता बॅनर्जी यांनी मुस्लिमांची मते आणि आपल्या पक्षाच्या गुंडांकडून सर्रास मतदानात गडबड करूनच आपली सत्ता राखली आहे. त्यासाठी त्यांनी बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्या मुसलमान यांना राज्यात उदार आश्रय दिला आहे. त्यांना सर्व सरकारी ओळखपत्रे बनवून दिली आणि मतदारयाद्यांमध्येही नावे घुसविली. निवडणूक आयोगाकडून सुरू असलेल्या मतदारयाद्यांच्या शुद्धीकरणाच्या (एसआयआर) मोहिमेला ममतांकडून कडाडून विरोध होत आहे, तो यासाठीच! या मोहिमेमुळे राज्यातील मृत मतदारांची नावे या मतदारयाद्यांमधून काढून टाकली जात आहेत आणि बोगस मतदारही आढळून येत आहेत. परिणामी, ममतांचा मतांचा हक्काचा आधारच नाहीसा होत आहे. यामुळे मुस्लीमही नाराज होत असल्याचे पाहून, मुस्लिमांना चुचकारण्यासाठी त्यांनी या समाजाच्या आक्रमक वृत्तीचे अप्रत्यक्ष कौतुक केले आहे. यातून आपण त्यांच्या धर्मांध प्रवृत्तीला खतपाणी घालत आहोत, हे ममतांना समजत नसेल, असे नाही. हिंदूंमध्ये आपल्या पक्षाबद्दल नाराजी वाढत चालल्याचे त्यांना जाणवले असून यावेळी फक्त मुस्लीम मतदारांवर अवलंबून राहून चालणार नाही, हेही त्यांनी ओळखले आहे. पण, हिंदू मतदारांना आपल्याकडे ओढण्यासाठी त्यांनी त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण करण्याचे धोरण अवलंबिले आहे. एकीकडे मुस्लिमांची वाढती लोकसंख्या मतपेढी म्हणून वापरायची आणि त्याच लोकसंख्येची भीती घालून हिंदूंकडेही मते मागायची, असे त्यांचे दुटप्पी धोरण. पण, राज्यात झालेल्या हिंसाचारात आजवर फक्त हिंदूंचीच हत्या झाली असून, तेव्हा ममता बॅनर्जी कधीही हिंदूंच्या बाजूने उभ्या राहिल्या नव्हत्या, हेही हिंदू समाज जाणतो. तसेच राज्यातील इमामांना सरकारी तिजोरीतून मासिक वेतन देणे, ईदसाठी दुर्गापूजेवर निर्बंध आणणे, 'जय श्रीराम' घोषणेवर खटले दाखल करणे, संदेशखाली येथे हिंदू महिलांवर अत्याचार करणाऱ्या आपल्या पक्षाच्या मुस्लीम नेत्यावर कारवाई न करणे, धर्मांध मुस्लीम नेत्यांना चुचकारणे यांसारख्या त्यांच्या कृतीही हिंदू समाजाच्या मनात ताज्या आहेत. हुमायून कबीर या तृणमूलमधून तोंडदेखले निलंबन केलेल्या आमदाराने राज्यात बाबरी मशीद उभारण्यास प्रारंभ केला असून, त्यापासून त्याला रोखण्यासाठी ममतांनी काहीही केलेले नाही, ही घटना तर ताजीच आहे. त्यामुळे ममतांचे हे ढोंग हिंदूंना फसवू शकणार नाही, असे भाजपने म्हटले आहे. राज्यातील हिंदूंची मते मिळविण्यासाठी या पक्षाने एकीकडे हिंदूंना धमकाविताना दुसरीकडे बंगाली अस्मितेचा मुद्दा बाहेर काढला आहे. या पक्षाच्या एक वादग्रस्त नेत्या महुआ मोईत्रा यांनीही नुकतेच असे वक्तव्य केले की, ''तुम्ही तृणमूल काँग्रेसला मत दिले नाही, तर तुम्ही बंगालीच नाही.'' आपला पक्ष म्हणजेच बंगाल, अशी सांगड घालण्याचा त्यांचा हा प्रयत्न. आपला पक्ष म्हणजेच आपल्या राज्याची अस्मिता, असा समज काही प्रादेशिक नेत्यांना होत असतो. यापूर्वी महाराष्ट्रातही काहीजणांना असेच वाटत होते. पण, 'मराठी अस्मिता' ही कोणत्याही एका पक्षाची मिरास नाही, हे गेल्या विधानसभा आणि नुकत्याच झालेल्या महापालिकांच्या निवडणुकीत मराठी जनतेने दाखवून दिले. तृणमूलच्या नेत्यांच्या भ्रमाचा भोपळाही असाच येत्या विधानसभा निवडणुकीत फुटणार आहे आणि बंगालमधील हिंदू ममतांना त्यांची जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही, हे निश्चित!

# डोणगावची 'गुगल गर्ल' कोमल खनपटेचा सत्कार

## इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमधील विक्रमाबद्दल सन्मान; स्व. सुनिता आखाडे यांच्या आदर्शाने यश मिळवा : डॉ. सारीका बाजड

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/ प्रतिनिधी :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून संजीवनी सेवाभावी महिला मंडळ, तेजस्विनी महिला मंडळ व महिला शिक्षिका भगिनींच्या वतीने श्री शिवाजी हायस्कूल येथे आयोजित गुणवंत विद्यार्थिनींच्या सत्कार सोहळ्यात डोणगावची 'गुगल गर्ल' म्हणून ओळख असलेल्या कु. कोमल देविदास खनपटे हिचा विशेष सत्कार करण्यात आला.





भारतातील सर्व राज्यांची नावे अवघ्या काही सेकंदांत सांगत तिने इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद करून अनोखा विक्रम प्रस्थापित केला असून या उल्लेखनीय यशाबद्दल तिला सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. सारीका बाजड यांनी सांगितले की, आदर्श शिक्षिका स्व. सुनिता प्रतापराव आखाडे यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक विद्यार्थीनीने शालेय स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेत आपल्या गुणवत्तेच्या बळावर यशश्री खेचून आणावी. दि. ९ मार्च रोजी आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. वंदना आखाडे होत्या.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत डॉ. सुनिता जुनघरे, डॉ. सारीका बाजड व डॉ. प्रांजली बाजड उपस्थित होत्या. तसेच अतिथी म्हणून मुख्याध्यापिका सौ. वैशाली आंबेकर, माजी सरपंच सौ. रेखा पांडव, सौ. ज्योती बुरखंडे, सौ. निर्मला बाजड, सौ. नंदा लांभाडे, सौ. सैय्यद महेफुजा आदी मान्यवर महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व समाजपरिवर्तन घडवून आणणाऱ्या क्रांतिकारी महिलांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली.

आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक मनोगतातून तेजस्विनी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. अश्विनी आखाडे यांनी कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट करत स्व. सुनिता आखाडे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी आयोजित वकृत्व स्पर्धेत कु. श्रावणी राजू सवडतकर, कु. पूजा संदीप फुके, कु. श्रावणी सचिन आहेर, कु. समृद्धी राजेश निर्गुणकर, कु. संस्कृती मिलिंद खोडके, कु. प्रणिता प्रकाश खिल्लारी, कु. तेजस्विनी रवि पळसकर आदी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. तसेच कु. कोमल देविदास खनपटेसह एकूण पंधरा गुणवंत विद्यार्थिनींना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी डॉ. सारीका बाजड, सौ. वैशाली आंबेकर व सौ. ज्योती बुरखंडे यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व पटवून देत विद्यार्थिनींना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्वाती खंडारे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. सिता झगडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. पूजा खोरणे, सौ. कविता भुयार तसेच शाळेतील विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले. दरम्यान, कार्यक्रमात माजी प्राचार्य स्व. सुरेशराव बाजड यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी संजीवनी परिवाराचे अध्यक्ष डॉ. गजानन उल्हामाले, प्राचार्य संजय बाजड, उपप्राचार्य सुरेंद्रसिंह चव्हाण, पर्यवेक्षक किरण आखाडे, पत्रकार हमीद मुल्लाजी, मुख्य संपादक देविदास खनपटे तसेच शिक्षकवृंद व विद्यार्थिनी उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र हे देशातील पहिले ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था असलेले राज्य होणार : मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या विकासासाठी आर्थिक शिस्त राखणे गरजेचे आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक वाठविण्यात आली आहे. महाराष्ट्र देशात आर्थिकदृष्ट्या मजबूत राज्य म्हणून उभे राहत असल्याचे सांगून पुढील काही वर्षांत महाराष्ट्र हे देशातील पहिले ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था असलेले राज्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला मुख्यमंत्री फडणवीस विधानसभेत उत्तर देताना बोलत होते. अर्थसंकल्पावरील चर्चेत सुमारे ८४ सदस्यांनी सहभाग घेतला होता. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याची आर्थिक स्थिती, कर्जाचे प्रमाण, सिंचन, वीज, उद्योग, पायाभूत सुविधा, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री आवास योजना आदी विषयांवर सविस्तर माहिती दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी भाषणाच्या सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त त्यांना अभिवादन केले. तसेच अर्थसंकल्प सादर केलेल्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज जयंती असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्याला पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. अडचणी असूनही आर्थिक शिस्त राखून विकास साधण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे. उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांनी सातत्याने आर्थिक शिस्त पाळली. त्यांच्याप्रमाणेच या अर्थसंकल्पात आर्थिक शिस्त पाळण्याचा प्रयत्न केला आहे. राज्याच्या प्रगतीसाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्याची अर्थव्यवस्था झपाट्याने विस्तारत सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याने ऑस्ट्रिया, थायलंड, नॉर्वे, फिलिपाईन्स, व्हिएतनाम आणि बांगलादेश या देशांच्या अर्थव्यवस्थांनाही मागे टाकले आहे. पुढील दोन-तीन वर्षांत संयुक्त अरब अमिराती आणि सिंगापूरलाही महाराष्ट्र मागे टाकू शकतो, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०१३-१४ मध्ये राज्याचे सकल राज्य उत्पादन (जीएसडीपी) सुमारे १६ लाख कोटी रुपये होता. गेल्या दहा वर्षांत तो वाढून ५१ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. स्थिर किमतीवर राज्याचा विकासदर ७.९ टक्के तर चालू किमतीवर १०.४ टक्के आहे. दरडोई उत्पन्न ३,१७,८०० रुपयांवरून ३,४७,९०३ रुपयांपर्यंत वाढले आहे. देशाच्या लोकसंख्येत महाराष्ट्राचा वाटा ९.५ टक्के असला तरी देशाच्या जीडीपीमध्ये राज्याचा वाटा १४.३ टक्के आहे. परकीय गुंतवणूक, तेलाव्यतिरिक्त निर्यात, स्टार्टअप्स, युनिकॉर्न, बँक ठेवी, बँक कर्ज वितरण आणि जीएसटी संकलनात महाराष्ट्र देशात अव्वल असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच 'फॉरेस्ट ऑफ इंडिया' अहवालानुसार वृक्षआच्छादनातही

राज्य पहिल्या क्रमांकावर असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्याच्या कर्जाबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, उत्पन्नाच्या तुलनेत कर्जाचा विचार केला पाहिजे. २०१३-१४ मध्ये राज्याचे उत्पन्न १६ लाख कोटी रुपये असताना कर्ज सुमारे ३ लाख कोटी रुपये होते. आता उत्पन्न ५१ लाख कोटी रुपयांवर गेले असून कर्ज ९.३२ लाख कोटी रुपये आहे. राज्याचा 'डेट टू जीडीपी' गुणोत्तर सुमारे १८.२ टक्के असून ते २५ टक्क्यांच्या मर्यादेपेक्षा खूपच कमी आहे. गुजरात (१५.३%) आणि ओडिशा (१३.१%) सोडल्यास इतर अनेक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राची वित्तीय स्थिती अधिक सक्षम आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, पंजाब, केरळ, पश्चिम बंगाल यांसारख्या राज्यांमध्ये हे प्रमाण ३० ते ४६ टक्क्यांपर्यंत असल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्राच्या करांमधून मिळणारा महाराष्ट्राचा हिस्सा २०१३-१४ मध्ये १६,५८८ कोटी रुपये होता. तो वाढून २०२५-२६ मध्ये ८७,९०३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. सहाय्यक अनुदानेही १३,२४१ कोटी रुपयांवरून सुमारे ६८ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढली आहेत. वित्त आयोगाकडे केलेल्या मागणीमुळे राज्याला सुमारे ९० हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त फायदा होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

राज्याची महसुली प्राप्तीही दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ती १.५५ लाख कोटी रुपयांवरून सुमारे ६.१६ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राजकोषीय तूट ३ टक्क्यांच्या मर्यादेत ठेवणे आवश्यक असते. महाराष्ट्रात ती २.७८ टक्के आहे. महसुली तूटही १ टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्यात यश आले आहे. २०१९-२० मध्ये महसुली तूट ४१ हजार कोटी रुपये होती, ती आता ४० हजार कोटी रुपयांवर आणली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण, शेतकऱ्यांना मोफत वीज देऊनही राज्य शासनाने राजकोषीय तूट कमी ठेवण्यात आले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

२०१३-१४ मध्ये राज्याचा भांडवली खर्च २५ हजार कोटी रुपये होता. तो आता वाढून सुमारे २ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. पॅरास्टेटल संस्थांचा विचार केला

नाही तरीही हा खर्च १.१७ लाख कोटी रुपये आहे. त्यामुळे कर्जवाढीपेक्षा विकासासाठी गुंतवणूक अधिक वाढल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र २०२९-३० च्या सुमारास ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. सध्या राज्याची अर्थव्यवस्था सुमारे ६६० अब्ज डॉलरवर पोहोचली असून गेल्या वर्षातच ५५ अब्ज डॉलरची वाढ झाली आहे. त्याच गतीने वाढ कायम राहिल्यास पुढील पाच-सहा वर्षांत लक्ष्य गाठणे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. २०४७ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था पाच

ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रधानमंत्री आवास योजनेत मोठी प्रगती

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजनेसाठी राज्याने १४,३०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सामाजिक-आर्थिक जनगणनेतील त्रुटी लक्षात घेऊन 'आवास प्लस' पोर्टलद्वारे नव्याने सर्वेक्षण करण्यात आले. त्यात महाराष्ट्रात ३० लाख घरांची गरज नोंदवली गेली. या योजनेत एकाच वर्षात ३० लाख घरांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी सुमारे २५ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना पहिला हप्ता देण्यात आला आहे. १५ लाख घरांचे काम दुसऱ्या टप्प्यात पोहोचले असून सुमारे ४ लाख घरे पूर्ण झाली आहेत. या घरांवर सुरुवातीपासूनच सौरऊर्जा प्रणाली बसवली जाणार आहे.

जलजीवन मिशन योजनेत राज्यात ८१ टक्के घरांना नळाद्वारे पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. जलजीवन मिशन अंतर्गत ५१ हजारांहून अधिक योजना राबविल्या जात असून त्यापैकी २६ हजारांहून अधिक पूर्ण झाल्या आहेत. या योजनांवरील सुमारे १५ हजार कोटी रुपयांची थकबाकी होती. यावर्षी केंद्र आणि राज्याकडून १२,८०० कोटी रुपये उपलब्ध होणार असल्याने अडचणी दूर होतील, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ता योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठी १,००० कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आली आहे. यामध्ये यंत्रसामग्रीच्या साहाय्याने शेतरस्ते तयार केले जाणार असून भूमीकरणासाठी प्रति किलोमीटर १५ लाख रुपये दिले जातील, असे त्यांनी सांगितले.

सामाजिक न्याय विभागाचा निधी ३८ टक्क्यांनी कमी केल्याचा आरोप चुकीचा असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. वितरित निधीपैकी सुमारे ७६ टक्के रक्कम वितरित झाली असून त्यातील ८७ टक्के खर्च झाली आहे. आदिवासी विकास विभागातही ८३ टक्के निधी वितरित झाला असून सुमारे ७० टक्के खर्च झाला आहे.

क्रीडा प्रबोधिनींवर मोठ्या प्रमाणात खर्च करत असून माध्यमातून राज्यातील खेळाडूंचा दर्जा वाढत आहे. २०२३-२४ मध्ये महाराष्ट्राने १२२ पदके जिंकली असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याची अंतिम सिंचन क्षमता ८१ लाख हेक्टर आहे. जून २०२४ पर्यंत ५७ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. मराठवाड्यात १७ लाख हेक्टर अंतिम क्षमतेपैकी १२.६८ लाख हेक्टर तयार झाली असून उर्वरित प्रकल्पांवर काम सुरू आहे.

मराठवाड्यातील दुष्काळ निवारणासाठी उल्हास खोऱ्यातील पाणी मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात नेण्याचा ८७ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प प्रस्तावित आहे. प्रारूप अहवालानुसार ७८ टीएमसी पाणी वळवता येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुढील काही दिवसात सविस्तर प्रकल्प अहवाल बनवून त्याला मान्यता घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

द म ण ग ं गा वै त र णा ग ा दा व री, दमणगंगाएकदरेगोदावरी, वैनगंगानळगंगा अशा विविध नदीजोड प्रकल्पांनाही गती देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई महानगर क्षेत्रासाठी पोशीर, शिलार आणि गारगाई या धरणांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच दमणगंगा-पिंजाळ प्रकल्पातूनही पाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पुढील ३०-४० वर्षे पिण्याच्या व औद्योगिक पाण्याची समस्या निर्माण होणार नाही, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवीकरणीय ऊर्जा व ऊर्जा साठवणूक धोरण २०२५-३५ या कालावधीसाठी लागू करण्यात आले आहे. २०३० पर्यंत राज्यातील ५२ टक्के आणि २०३५ पर्यंत ६५ टक्के वीज अपारंपरिक स्त्रोतांमधून मिळवण्याचे लक्ष्य आहे. या क्षेत्रात १ लाख मेगावॅट नवीकरणीय ऊर्जा क्षमता आणि ऊर्जा साठवणुकीची मोठी व्यवस्था उभारली जाणार आहे. यासाठी १,६५० कोटी रुपये सार्वजनिक गुंतवणूक आणि ३.१२ लाख कोटी रुपयांची खासगी गुंतवणूक अपेक्षित असल्याचेही त्यांनी सांगितले.

'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून दररोज सुमारे १,५०० पंप बसवले जात आहेत. या योजनेमुळे सुमारे ४० लाख एकर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' अंतर्गत २७ जिल्ह्यांमध्ये ३,८८१ उपकेंद्रांसाठी प्रकल्प सुरू असून सुमारे १०.२५ लाख शेतकरी लाभार्थी झाले आहेत. राज्यातील ४६ लाख कृषी ग्राहकांपैकी ३३ लाखांना दिवसा वीजपुरवठा शक्य झाला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. वीज खरेदी खर्चामध्ये १० हजार कोटी रुपयांची बचत महावितरणने केली असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत बिजली योजनेत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असून देशातील सर्वाधिक रुफटॉप सोलर महाराष्ट्रात लावण्यात आले आहे आहे. महाराष्ट्राने रिसोर्स अडोकसी प्लॅन तयार केला आसून असा प्लॅन तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

राज्यात प्रथमच पाच वर्षांचा मल्टी-इयर टॅरिफ निश्चित करण्यात आला आहे. घरगुती ग्राहकांसाठी वीजदर पुढील पाच वर्षांत २६ टक्क्यांनी कमी होणार आहेत. औद्योगिक व व्यापारी ग्राहकांनाही सवलत देण्यात आली आहे. कमी दरात वीज खरेदी करारांमुळे सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे.

वीज क्षेत्रात केलेल्या सुधारणांची दखल देशाने घेऊन आपल्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरचे ५५ पुरस्कार मिळाले आहेत. ऊर्जा क्षेत्रातील गेल्या दोन वर्षातील सगळे पुरस्कार महाराष्ट्राला मिळाल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ६३,७३२ शाळांपैकी ५३,७०९ शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा किंवा स्मार्ट क्लासरूम उपलब्ध आहेत. उर्वरित लहान शाळांमध्येही टप्प्याटप्प्याने डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवीन औद्योगिक धोरणामुळे व दिलेल्या प्रोत्साहनामुळे राज्यातील अनेक नवीन जिल्ह्यांमध्ये गुंतवणूक येऊ लागली आहे. नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये गुंतवणूक वाढत आहे. नांदेडमध्ये ४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सोलापूरमध्ये आयटी पार्कसाठी जागा चिन्हांकित केली असून याच वर्षी त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध केला जाईल. सोलापूर विमानतळावर नाईट लँडिंगची सुविधा देण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी ठेवण्यात आला असून यासंदर्भात केंद्र शासनाशी बोलणी अंतिम टप्प्यात आहे. तसेच तेथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयही सुरू केले जाईल, अशी घोषणाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली. सोलापूरकडे विशेष लक्ष असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

कांदिवली पूर्व येथील नाट्यगृहाबाबत महानगरपालिकेला निर्देश दिले जातील. लोखंडवालागोरेगावठाणे डीपी रोड दोन वर्षांत पूर्ण करण्याचे निर्देश दिले जातील. अमरावती येथे १११ फूट उंचीच्या बजरंगबली मूर्तीचा 'हनुमानगढी' प्रकल्प १२१ कोटी रुपयांत उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. माजी मंत्री बाळासाहेब देसाई यांच्या स्मारकासाठीचा ऊर्वरित निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

उत्तरप्रदेशातील मनकर्णिका घाटाचे संवर्धनाचे काम सुरू आहे. पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू आहे. तेथील अंत्यसंस्कार घाट, लाकूड ठेवण्याची जागा, धार्मिक विधीची जागा, मुंडण जागा, पिण्याचे पाणी व प्रसाधनगृहाची सुविधा या सर्व गोष्टींचे काम सुरू आहे. तसेच महाकाल मंदिर, तारकेश्वर मंदिर, महादेव मंदिर आणि अन्य मंदिरांचेही संवर्धन होत आहे. ज्योतिर्लिंग देवस्थानाप्रमाणेच ही कामे होत असून कुठलीही मुर्ती काढली जाणार नाही. उलट अधिक सुविधा निर्माण होतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# आर्थिक प्रगतीबरोबरच कला, क्रीडा आणि साहित्य क्षेत्रातील प्रगतीही महत्त्वाची- मंत्री चंद्रकांत पाटील

## ६५ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन प्रसंगी विविध कला पुरस्कारांचे वितरण

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :कोणताही समाज कला, क्रीडा आणि साहित्याच्या विकासामुळेच मोठा होत असतो. आर्थिक प्रगतीबरोबरच या क्षेत्रांतील प्रगतीही तितकीच महत्त्वाची आहे. शासनाने प्रदर्शन आणि विविध पुरस्कारांच्या माध्यमातून कला क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली असून पुरस्कारांच्या रकमांमध्येही भरीव वाढ करण्यात आली असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

६५ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमासाठी सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू हीमकुमार चटर्जी, कला संचालनालयाचे संचालक डॉ किशोर इंगळे, पद्मश्री वासुदेव कामत, ज्येष्ठ शिल्पकार किशोर ठाकूर, आदी उपस्थित होते.

राज्य कला प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी येथे आयोजित करण्यात आले असून यावेळी कला जीवन गौरव पुरस्कार वितरण करण्यात आले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील म्हणाले की, कला संचालनालयाच्या वतीने कलाक्षेत्रातील पदविका परीक्षांना बोर्ड परीक्षेचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या बोर्ड परीक्षांसाठी संचालनालयाशी २०० पेक्षा अधिक संस्था जोडल्या गेल्या आहेत. तसेच सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट ला अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळावा यासाठी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आणि त्याला यशही मिळाले. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ही कलाक्षेत्रातील ऐतिहासिक व जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त संस्था असल्याचे त्यांनी नमूद केले.

कलाकारांना ईश्वरीय देणगी लाभलेली असते. त्यांच्या सृजनातून चित्रकला, शिल्पकला यांसारख्या



विविध माध्यमांतून भारताचे सांस्कृतिक प्रतिबिंब उमटत असते, असेही मंत्री पाटील यांनी सांगितले.

**वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कारांचे वितरण**

यावेळी मंत्री पाटील यांच्या हस्ते २०२३-२४ ते २०२५-२६ या कालावधीतील वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कारांचे तसेच विविध कला पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार सन २०२३-२४ साठी शिल्पकार किशोर ठाकूर यांना, २०२४-२५ चा ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि.द.फडणीस यांना तर २०२५-२६ पुरस्कार चित्रकार पद्मश्री वासुदेव कामत यांना प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ व्यंगचित्रकार फडणीस यांच्या वतीने त्यांच्या कन्या रूपा देवधर यांनी स्वीकारला. ज्येष्ठ कलाकार पुरस्कार चित्रकार विलास शिंदे यांना देण्यात आला.

कला जीवन गौरव पुरस्कारासाठी ५ लाख रुपये आणि सन्मानचिन्ह, ज्येष्ठ कलाकार पुरस्कारासाठी दीड लाख रुपये व सन्मानचिन्ह, तर विभागीय पुरस्कारांसाठी ७५ हजार रुपये व सन्मानचिन्ह देण्यात आले. या प्रसंगी विभागीय स्तरावरील १५ पुरस्कारांचेही वितरण करण्यात आले.

६५ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनासाठी राज्यभरातून एकूण १२६६ कलाकृती दाखल झाल्या होत्या. त्यापैकी २६८ उत्कृष्ट कलाकृतींचे प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी येथे आयोजित करण्यात आले आहे. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री आणि उपस्थित मान्यवरांनी गॅलरीतील प्रदर्शित कलाकृतींची पाहणी केली.

## बालसुरक्षा आणि डिजिटल सक्षमीकरणासाठी १३ मार्च रोजी ‘महा-संकल्प’ नेतृत्व संवादाचे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी :**राष्ट्रीय ध्येय ‘विकसित भारत २०४७’ च्या दिशेने वाटचाल करताना बालकांचे सुरक्षित आणि सक्षम भविष्य घडविण्यासाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोग () आणि चाइल्डफंड इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ‘महा-संकल्प’ या उच्चस्तरीय नेतृत्व संवादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम १३ मार्च २०२६ रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर (), बीकेसी, येथे होणार आहे.

डिजिटल युगात मुलांसमोर निर्माण होणारे विविध धोके आणि आव्हाने लक्षात घेता मुलांच्या जगण्याचा, विकासाचा, संरक्षणाचा आणि सहभागाचा अधिकार सुरक्षित ठेवणे हा या संवादाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, तसेच गृहराज्य मंत्री (ग्रामीण) पंकज भोयर, गृहराज्य मंत्री (शहर) योगेश कदम यांची उपस्थिती लाभणार आहे.या नेतृत्व संवादात आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, सायबर क्राईम विभाग, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी तसेच विविध आयटी कंपन्यांचे प्रतिनिधी, कॉर्पोरेट क्षेत्रातील तज्ज्ञ आणि नामांकित शैक्षणिक संस्थांचे नेतृत्व सहभागी होणार आहे. बालकांच्या ऑनलाइन सुरक्षिततेसाठी आवश्यक धोरणात्मक उपाययोजनांवर या मंचावर सखोल चर्चा होणार आहे.

# गॅस एजन्सीच्या रांगेत वेळ वाया न घालवता! घरबसल्या Whats-pp वर ‘Hi’ पाठवून LPG सिलेंडर बुक करा

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई : मध्यम पूर्वमधील युद्धामुळे भारतात घरगुती गॅस पुरवठ्यावर ताण आलेला आहे. इराण-इजराइल आणि अमेरिकेतील संघर्षामुळे हॉर्मुज जलमार्ग बंद झाला असून, याचा थेट परिणाम गॅस सप्लाईवर झाला आहे. त्यामुळे अनेक राज्यांमध्ये गॅस एजन्सींमध्ये सिलेंडर मिळवण्यास समस्या येत आहे.. सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत ६० रुपयांनी वाढ केली असून, बुकिंग पीरियड २१ दिवसांपासून २५ दिवसांपर्यंत वाढवले आहे. तसेच दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि राजस्थानसारख्या राज्यांमध्ये हॉटेल व फॅक्ट्र्यांच्या (कॉमर्शियल) गॅस पुरवठ्यावर सध्या ब्रेक देण्यात आला आहे, ज्यामुळे घरगुती वापरासाठी




गॅस मिळण्यास अडचण होणार नाही.

**घरबसल्या LPG सिलेंडर कसा बुक करावा**

सिलेंडर कमी झाल्यास एजन्सींवर गर्दी होते, ज्यामुळे गर्दीत जाणे टाळण्यासाठी व्हॉट्सअॅप, मिस्ड कॉल, किंवा मोबाईलअॅप वापरणे सोयीचे ठरते.

इंडेन गॅस (Indane Gas)

व्हॉट्सअॅप: ७५८८८ ८८८२४ वर 'REFILL' टाईप करून पाठवा.

मिस्ड कॉल: ८४५४९ ५५५५५ वर मिस्ड कॉल द्या.

IVRS/**एसएमएस:** ७७१८९ ५५५५५ वर कॉल किंवा मेसेज करूनही बुक करता येईल.

HP गॅस (HP Gas)

व्हॉट्सअॅप: ९२२२२ ०११२२ सेव करून ’क्ळ’ पाठवा.

मिस्ड कॉल: ९४९३६ ०२२२२ वर मिस्ड कॉल.

अॅप : 'HP Pay'अॅप किंवा -mazon/Paytm वरून पेमेंटसह बुकिंग करा.

**भारत गॅस** (Bharat Gas)

व्हॉट्सअॅप: १८००२२४३४४ वर 'Hi' पाठवा.

IVRS: ७७१५०१२३४५ किंवा ७७१८०१२३४५ वर कॉल करा.

एसएमएस: 'LPG' ७७१५०१२३४५ वर पाठवा.

**सिलेंडर लवकर मिळवण्याचे मार्ग**

२५ दिवसांचा नवीन बुकिंग पीरियड लागू असल्यामुळे, कोटा खुलताच तत्काळ ऑनलाइन बुकिंग करा. व्हॉट्सअॅप किंवा अॅपवरून बुकिंग केल्यास लगेच बुकिंग रेफरन्स नंबर मिळतो, ज्यामुळे डिलिव्हरी ट्रॅक करणे सोपे होते.

जर आपला मोबाइल नंबर एजन्सीमध्ये रजिस्टर केलेला नसेल, तर प्रथम आपल्या एजन्सीकडे जाऊन किंवा खतठड द्वारे अपडेट करा. यामुळे तुम्ही घरबसल्या बुकिंगची सुविधा पूर्णपणे वापरू शकाल.

**घरबसल्या बुकिंगचे फायदे**

एजन्सीच्या रांगेत उभे राहणे्टाळता येते.

बुकिंग लगेच होत असल्याने सिलेंडर पटकन मिळतो.

पेमेंट व बुकिंग एकाच ठिकाणी करता येते.

या सोप्या उपायांनी, आता तुम्हाला सिलेंडरसाठी बाहेर धावपळ करावी लागत नाही, आणि घरगुती स्वयंपाक सुरळीत चालू राहतो.

## संक्षिप्त...

### कुणबी प्रमाणपत्र वाटपावरून मनोज जरांगे आक्रमक; आमदारांना दिला थेट इशारा



**दैनिक आपला विदर्भ**

**जालना/प्रतिनिधी :** कुणबी प्रमाणपत्र वाटपाच्या मुद्द्यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी राज्य सरकार आणि आमदारांवर नाराजी व्यक्त केली आहे. कुणबी प्रमाणपत्र वाटप का होत नाही याबाबत सर्व आमदारांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारावा, अन्यथा मराठा समाज आमदारांनाच जाब विचारेल, असा थेट इशारा जरांगे यांनी दिला आहे.


मुंबई आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅजेटिअर लागू केले असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नसल्याचा आरोपही त्यांनी केला. मराठा आरक्षणासाठी आपण मागील अडीच वर्षांपासून लढा देत असून अनेक मराठा समाजबांधवांना आरक्षणाचा लाभ मिळाला आहे, तर उर्वरित समाजालाही आरक्षण मिळेल, असा विश्वास जरांगे यांनी व्यक्त केला.

मात्र राज्याच्या कानाकोपऱ्यात समाजासाठी काम करणारी यंत्रणा नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस तुटवड्याचा फटका सर्वसामान्यांना बसू नये, याची जबाबदारी राज्य आणि केंद्र सरकारची असल्याचेही जरांगे यांनी स्पष्ट केले.

### नांदेडनागपूर महामार्गावर हायवा टिपरला अचानक आग; जिवितहानी टळली

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी:** : नांदेड ते नागपूर जाणाऱ्या महामार्गावर हायवा टिपर गाडीला अचानक आग लागल्याची घटना घडली आहे. ही घटना पिंपळगाव शिवारातील पेट्रोल पंपासमोर घडली असून नांदेडकडे



जाणारी हायवा टिपर अचानक पेट घेतल्याने परिसरात काही काळ खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. या घटनेमुळे काही वेळ महामार्गावरील वाहतूक खोळंबली होती.

दरम्यान, पोलिसांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत केली आणि प्रवाशांसाठी रस्ता पुन्हा खुला करून दिला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.


## शब्दकोडे क्र. 78

आडवे शब्द

१. राज्यकारभाराचे प्रमुख शहर ४. प्रत्येक वर्षी ७. ’सगळा हवाला रामावर!’ याअर्थी शब्दप्रयोग १०. सुगंधी पानांची वनस्पती १२. मराठी भाषिकांचे राज्य १३. नासाडी, नाश १५. पादत्राण १७. रंगविलेले १९. अपशकुन २०. कोर्टातील खटला २१. युद्ध २३. मागील अंगण २५. बिनवासाचे पांढरे फूल २७. जागृत २९. काका (इंग्रजी) ३१. चेष्टा ३२. माधुर्य ३३. विचार करणारा, सूज्ञ ३५. ग्रामीण बोलीत घटस्फोट ३७. माफी ३९. मौज, बहार ४१. पालव ४४. इतरांहून निराळा ४६. युक्ती ४८. आपटणे, टक्कर देणे ५०. सुवर्ण ५१. मजबूत, भक्कम ५३. घोंगड्या विणणारी जमात ५४. फुरसत ५५. नवरदेव ५६. लाकूड कापण्याचे हत्यार ५८. जहर ५९. आरोप ६०. आजच्या आधीचा दिवस ६१. वाकलेला, नम्र ६३. साजसज्जा करणे ६४. उत्सवाचे दिवस ७०. इंद्र दरबारातील दोन अप्सरा ७१. अतिशय आनंद ७३. कमीजबरोबरचे वस्त्र ७४अ. कोणी तरी विशेष ७५. भेळमिसळीचा उत्तर भारतीय अवतार ७६. धातूचा धागा ७७. रवाळ ७८. अव्हेरणे, संकोचापोटी नाकारणे

उभे शब्द

१. दास जोडल्यास लाडवाचा प्रकार २. शेतकऱ्यांचा मित्र म्हटली जाणारी सापाची बिनविषारी जात ३. पाणी ५. चार वेदांपैकी एक ६. किचीत छोटा ७. देश ८. भ्रमंती, सतत प्रवास करणे ९. सेनापती ११. एकसारखे, सदोदित १४. उथळ वाटी १६. अधाशी, लालची १८. धुसफूस, जीवाला होणारा २०. मोठा भाऊ २२. मातीचा कण असला तरी हत्ती असल्याचा आभास निर्माण करणे अर्थात एखादी घटना फुगवून सांगणे याअर्थी वाक्प्रचार २४. राज्यशकट हाकणारे मंत्रीमंडळ २६. खिडकी २८. थंड २९. अंत:करण, अतील भाग ३०. निकट, जवळ ३२. साखरेची चव ३४. राग, क्रोध ३६. उन्हाळ्यात येणारे सुगंधी पांढरे फूल ३८. सन्मानाप्रित्यर्थ दिलेली अल्प रक्कम ४०. संकटातून, पेचातून सोडवणे याअर्थी वाक्प्रचार ४२. जाणे येणे ४३. स्थिती, अवस्था ४५. गीत ४६. हात, हस्त ४७. महिरप ४९. भय, भीती, शंका ५२. कोळशाची पूड ५३. नेहमी, निरंतर ५४. आकलन क्षमता ५६. मनाचा ओढा ५७. अरण्य ५९. आजूबाजूला ६०. व्यवस्था, कामाची देखरेख ६२. सर्कशीत हसविणारा ६३अ. भोजनानंतर मुखशुद्धी करणारा ६५. पुन्हा पुन्हा, फिरून फिरून ६६. विनंती ६७. हिंदीत परत ६८. संतोष, तृप्ती ६९. ’वॉशिंग मशीन’ मध्ये न होणारी क्रिया ७२. मराठी मुलूखाचा पठारी भाग ७४. वेल ७४अ. चानी ७५. मुख्य दिशांची संख्या



### शब्दकोडे क्र. 77 चे उत्तर

आडवे उत्तर

१.कोरडा ४.पारावार ६.साय ७.पर ९.सनसनाटी १२.जावई १३.दरड १५.ललकारी १६अ.बासमती १७अ.खरोखर १८.बरबाद २०.चारा २२.राही २३.प्रकाश २५.परत २६.समास २७.हालचाल २८.सारक २९.महामार्ग ३०.रव ३१.कतरण ३३.प्रतिकारक ३४.फरार ३६.काननबाला ४१.डबा ४२.नकलाकार ४४.राजीवलोचन ४७.घसा ४८.भोज्य ४९.खार ५०.समीर ५१.सामनावीर ५३.पसा ५५.दरारा ५६.पदरमोड ५८.नरम ६०.नाश ६१.बोट ६२.कप ६३.जम ६४.समरभूमी ६६.मदतनीस ६८.रणगाडा ६९.नवनीत ७०.रया

उभे उत्तर

१.कोप २.डास ३.वास ४.पाटील ५.रजा ६.साईबाबा ७.परतीचा मार्ग ८.रड १०.नजर ११.नाल १३.दम १४.आरोही १६.काया १७.सद १७अ.खराब १८.बरकत १९.रत २१.रास २३.प्रचारक २४.कालव २५.परकर २६.समाधान २७.हानिकारक २९.मणका ३२.गेलाबाजार ३३.प्रथा ३५.रामराज्य ३७.नयन ३८.बाड ३९.पर ४०.सलोखा ४२अ.लाघवी ४३.कासार ४५.चरणारविंद ४६.ठोसा ४८.भोवरा ५०.सवड ५२.नाकाम ५४.सापट ५५.दशरथ ५७.पाप ५८.नजर ५९.रमण ६०.नाम ६२.कसर ६४.सडा ६५.मीन ६६.मत ६७.तप

वृत्तविशेष...

## युद्धामुळं लग्नसराई संकटात; पिंपरी-चिंचवडमध्ये गॅस टंचाईमुळं लग्नांवर अनिश्चिततेचं सावट

दैनिक आपला विदर्भ

**पिंपरी-चिंचवड/प्रतिनिधी :**राज्यात सगळीकडं पुढील दोन महिन्यांत मोठ्या प्रमाणावर लग्न सोहळ्यांची लगबग सुरू आहे. परंतु, अचानक निर्माण झालेल्या गॅस टंचाईमुळं लग्नसराईवर मोठं संकट ओढावलं आहे. आखाती देशांम ध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळं व्यावसायिक गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. याचा थेट फटका शहरातील केटरिंग व्यवसायाला बसताना दिसत आहे. परिणामी, अनेक केटरर्सनी लग्न समारंभातील जेवणाच्या ऑर्डर रद्द करायला सुरुवात केली आहे. त्यामुळं शहरातील हजारो कुटुंबांच्या आनंदाच्या क्षणांवर चिंतेचं सावट पसरलं आहे. पिंपरी-चिंचवड शहरात लग्नाच्या मुहूर्ताच्या दिवशी साधारणपणे ४०० ते ५०० सोहळे पार पडतात. एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत सुमारे ३० लग्नाचे मुहूर्त असल्यामुळं या काळात किमान १० ते १२ हजार लग्न सोहळे होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या सर्व लग्न सोहळ्यांच्या जेवणाच्या ऑर्डर शहरातील नोंदणीकृत सुमारे ४५० केटरर्स तसंच अन्य लहान केटरर्स घेतात. मात्र, लग्नसराई सुरू होण्याच्या तोंडावरच गॅसचा तुटवडा निर्माण झाल्यानं केटरर्ससमोर मोठं संकट उभं ठाकलं आहे.

लग्नाच्या तयारीत असलेल्या घरात चिंतेचं वातावरण : व्यावसायिक गॅस सहज उपलब्ध होत नसल्यामुळं अनेक केटरर्सनी घेतलेल्या ऑर्डर रद्द करायला सुरुवात केली आहे. काही केटरर्सनी तर वधू-वरांच्या कुटुंबीयांना याबाबत निरोप देण्यासही सुरुवात केली आहे. त्यामुळं अनेक कुटुंबांना लग्न सोहळा पुढं ढकलण्याचा विचार करावा लागत आहे. लग्नाच्या तयारीत असलेल्या कुटुंबीयांमध्ये यामुळं चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे.

गणेश जगताप आणि पंडित वाळके यांसारख्या लग्नसराईच्या तयारीत असलेल्या कुटुंबीयांनी सांगितले की, ''लग्नासाठी हॉल, डेकोरेशन, वाजंत्री यांसारख्या अनेक गोष्टींची आगाऊ बुकिंग केलेली असते. मात्र, केटरिंग व्यवस्था कोलमडल्यास संपूर्ण विवाह समारंभाचं नियोजन विस्कळीत होण्याची भीती आहे. त्यामुळं आता लग्न पुढं ढकलावं लागेल का?, अशी चिंता मनात निर्माण झाली आहे''.

काही केटरर्स गॅसची जुळवाजुळव करण्यासाठी अधिक पैसे मोजत आहेत. मात्र यामुळं त्यांच्या खर्चात मोठी वाढ होत असल्यानं ते प्रति थाळीमागं १० ते २० टक्क्यांपर्यंत दरवाढ करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळं लग्नसम ारंभातील मेजवानीचा खर्चही वाढण्याची शक्यता आहे. त्याचा थेट परिणाम वधू-वरांच्या कुटुंबीयांच्या खिशावर होणार आहे. पिंपरी-चिंचवड केटरर्स असोसिएशनचे अध्यक्ष अण्णा कुदळे यांनी सांगितले की, ''शहरात सुमारे ४५० केटरर्स कार्यरत आहेत. त्यांच्याकडं अंदाजे ४५ हजार कामगार काम करतात. गॅसचा पुरवठा सुरळीत झाला नाही तर केटरर्सना मोठा आर्थिक फटका बसू शकतो. तसंच हजारो कामगारांच्या रोजगारावर गंडांतर येण्याची शक्यता आहे''.

## बारावीचा गणिताचा पेपर टेलिग्राम लिंकवर, ६00 रुपये भरल्यानंतर पुढे काय झालं?; जाणून घ्या घटनाक्रम!

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे गणित पेपर फुटीवर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी सविस्तर माहिती दिली. ९ मार्चला माहिती यासंदर्भात माहिती मिळाली. टेलिग्रामवर बारावीचा पेपर उपलब्ध होता. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मंडळाकडून देण्यात आली.

बारावीचा गणिताचा पेपर फुटल्याची बातमी समोर आली होती. यानंतर महाराष्ट्र बोर्डाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. यावर बोर्डाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. पैसे उकळण्यासाठी हा प्रकार केला असावा अशी माहिती बोर्डाकडून देण्यात आली. याचा घटनाक्रम यावेळी अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी सांगितला.

काय घडलं नेमकं?

बारावीचा गणिताचा पेपर उपलब्ध असल्याचा मेसेज टेलिग्राम चॅनलवर व्हायरल झाला होता. त्याची आम्ही दखल घेतली. मेसेज केल्यानंतर लिंक देण्यात आली. त्यावर पैसे भरायचे होते. पण नंतर पेपर उपलब्ध झाल्याची माहिती बोर्डाकडून देण्यात आली.

संबंधित टेलिग्राम लिंकवर ६०० रुपये भरण्यास सांगण्यात आले होते. ते पैसे आम्ही भरले. गणिताचा पेपर संपल्यानंतर गणित १ आणि २ पेपर आला. प्रथम दर्शनी पेपर फुटला नाही असे वाटत आहे. पैसे उकळण्यासाठी हा प्रकार केल्याचे यातून लक्षात आले. यासाठीच ही पोस्ट टाकण्यात आली होती. आम्ही आणि पोलिस याबाबत तपास करत आहोत, असे बोर्डाकडून सांगण्यात आले.

पेपर झाला त्यादिवशी फुटला नाही असे दिसत आहे. पेपर फुटलाय, असे यात सिद्ध झाले नाही. पेपर झाल्यानंतर अपलोड केले आहेत, अशी माहिती बोर्डाकडून देण्यात आली.

बीड पेपरफुटी


बीड पेपर फुटी प्रकरणी अजून कुठलीही माहिती नाही. दहावी परीक्षावेळी मराठी वेळी २३३ तर बारावी परीक्षेवेळी ४९ मास कॉपी प्रकार समोर आले आहेत. यानंतर ८१ शिक्षकावर निलंबन कारवाई करण्यात आल्याची माहिती बोर्डाकडून देण्यात आली.

# माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर यांची पुण्यात पाहणी

## मेहकरमध्ये लवकरच उभारल्या जाणार शिवरायांचा भव्य अश्वारूढ पुतळा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** मेहकर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात लवकरच छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार आहे. या पुतळ्याच्या निर्मितीची पाहणी करण्यासाठी आज पुणे येथे स्मारक समितीच्या सदस्यांनी प्रत्यक्ष भेट देत कामाचा आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यात स्मारक समितीचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव तसेच कार्याध्यक्ष माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर यांच्या नेतृत्वाखाली समितीचे सदस्य पुणे येथे दाखल झाले. यावेळी प्रसिद्ध शिल्पकार थोपटे सरांचे सहाय्यक पवार सर यांनी





पुतळ्याची रचना, उभारणीची प्रक्रिया, तांत्रिक बाबी तसेच पुतळ्याची भव्यता आणि दिव्यता याबाबत सविस्तर माहिती समितीला दिली.

उभारण्यात येणाऱ्या या अश्वारूढ पुतळ्याची उंची सुमारे २१ फूट असून पुतळा बसविण्यात येणाऱ्या चौथऱ्यासह एकूण उंची जवळपास ४५ फूट असणार आहे. तसेच या पुतळ्याचे अंदाजे वजन सुमारे ८ टन असणार असल्याची माहिती देण्यात आली.

मेहकर शहरासाठी हा पुतळा अत्यंत भव्य आणि प्रेरणादायी स्मारक ठरणार असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आठवण पुढील पिढ्यांना देणारा हा ऐतिहासिक उपक्रम ठरणार आहे.

यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते बबन भोसले, संपर्कप्रमुख दिलीप बापू देशमुख, तालुकाप्रमुख सुरेश तात्या वाळुकर, शहरप्रमुख जयचंद बाठीया, उद्योजक रवीशेठ अग्रवाल, नगरसेवक विशाल काबरा, ज्येष्ठ पत्रकार सिद्धेश्वर पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## मलकापूर रेल्वे स्थानकावर चाकू हल्ल्याने खळबळ

### ॲड. अमरकुमार संचेती यांच्यावर प्राणघातक वार; संतप्त नागरिकांकडून हल्लेखोर युवकास बेदम मारहाण

दैनिक आपला विदर्भ

**मलकापूर/प्रतिनिधी:** मलकापूर रेल्वे स्थानकावर चाकू हल्ल्याची धक्कादायक घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. ॲड. अमरकुमार संचेती यांच्यावर एका युवकाने धारदार चाकूने प्राणघातक हल्ला केला.

या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी हल्लेखोर युवकाला पकडून बेदम मारहाण केली. संपूर्ण घटना रेल्वे स्थानकावरील कॅमेऱ्यात कैद झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जखमी ॲड. अमरकुमार संचेती हे आपल्या मुलीला सोडण्यासाठी मलकापूर रेल्वे स्थानकावर गेले होते. त्यावेळी त्यांचा एका युवकासोबत वाद झाला. या वादातून संतप्त झालेल्या युवकाने



गर्दीचा फायदा घेत आपल्या जवळील धारदार चाकूने संचेती यांच्या मानेवर वार केला.

अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे रेल्वे स्थानक परिसरात एकच गोंधळ उडाला. दरम्यान, उपस्थित नागरिकांनी तत्काळ हल्लेखोर युवकाला पकडून त्याला बेदम मारहाण केली.

या घटनेत संचेती व हल्लेखोर युवक दोघेही जखमी झाले. दोन्ही जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, ही संपूर्ण घटना रेल्वे स्थानकावरील कॅमेऱ्यात कैद झाली असून पोलिसांनी प्रकरणाची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे

## नवीन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीला सुधारित धोरणाच्या आधारे गती देण्यात येणार – गृह राज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पोलीस ठाणे निर्मितीबाबत सुधारित धोरण तयार करण्यास गती देण्यात यावी, नवीन पोलीस ठाणेची निर्मिती करताना अनेक ठिकाणी मनुष्यबळाची कमतरता, पोलीस कर्मचाऱ्यांवर वाढणारा कामाचा ताण यामुळे वस्तुस्थितीदर्शक माहितीच्या आधारे सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश गृह राज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर यांनी दिले.

यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंत्रालयात गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीबाबत आढावा घेण्यात आला. बैठकीस सर्वश्री आमदार समीर कुणावार, अमोल पाटील, सुहास बाबर तसेच विशेष पोलीस निरीक्षक सुवेज हक, गृह विभागाचे उपसचिव राजेंद्र भालवणे आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. यासह जळगाव, वर्धा आणि सांगली जिल्हा पोलीस अधीक्षक दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

याप्रसंगी जळगाव जिल्ह्यातील देवगाव, सांगली जिल्ह्यातील खानापूर तसेच वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट ग्रामीण येथे नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती तसेच वरणगाव पोलीस ठाण्याचा भुसावळ उपविभागात समावेश करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

बैठकीत वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी वरणगाव पोलीस ठाणे हे मुक्ताईनगर विभागातून भुसावळ उपविभागात समावेश



करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात नवीन पोलीस ठाणे निर्मितीबाबतचे निश्चित धोरण तयार करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच प्रस्तावित नवीन पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्हयांची संख्या, लोकसंख्येची घनता, विशेष भौगोलिक स्थान, मोठी धार्मिक व पर्यटन स्थळे, सुरक्षेच्या दृष्टीने अतीमहत्वाची ठिकाणे, औद्योगिकीकरण व शहरीकरण यामुळे जीवनमान पद्धतीत झालेला बदल, त्यानुसार गुन्ह्यांचे बदललेले स्वरुप महत्त्वाचे ठरते आहे.

यासह तंत्रज्ञानाचा समाजात मोठ्या प्रमाणात झालेला प्रसार व वाढता वापर त्या माध्यमातून होणारे आर्थिक फसवणूकीचे गुन्हे या अनुषंगाने नवीन पोलीस ठाणे निर्मितीबाबतचा सुधारित प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. पोलीस यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी पोलीस स्टेशन निर्माण केल्यानंतर त्याकरिता आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यावर भर असल्याचेही राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले. या बैठकीत राज्यातील नवीन पोलीस ठाण्यांच्या प्रस्तावांची सद्यस्थिती, निकषांमधील आवश्यक सुधारणा तसेच मनुष्यबळाच्या उपलब्धते संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

## अक्षय कुमारच्या भूतबंगला चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित, टीझर गुरुवारी प्रदर्शित होणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बालाजी मोशन पिक्चर्सने भूतबंगला चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित केले आहे. या चित्रपटात बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार याची प्रमुख भूमिका आहे. भूतबंगला या चित्रपटाचा टीझर गुरुवारी प्रदर्शित होणार आहे.

प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये क्षय कुमार झाडाच्या फांदीवर उलटा लटकल्याचे दिसत आहे. अक्षयच्या चेहऱ्यावर अनोखे भाव दिसत आहेत. अक्षयच्या मागे घनदाट जंगल दिसत आहे. अक्षयच्या भोवतालची वटवाघुळे वावरत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. हे अनोखे पोस्टर चित्रपट कशा स्वरुपाचा असेल याची थोडक्यात पण प्रभावी झलक दाखवण्यात यशस्वी होते. भूतबंगला चित्रपटात सुपरनॅचरल ड्रामा आणि कॉमेडीचा जोरदार तडका अनुभवता येणार आहे.भूतबंगला या चित्रपटातून अक्षय कुमार आणि प्रियदर्शन यांची बहुप्रतीक्षित जोडी पुन्हा एकदा एकत्र येत आहे. या जोडीने यापूर्वीही अनेक सुपरहिट कॉमेडी चित्रपट दिले आहेत, जे आजही प्रेक्षकांचे आवडते आहेत. त्यामुळे या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. आपल्या उत्कृष्ट कॉमिक टाइमिंग आणि मजेदार कथांसाठी प्रसिद्ध असलेली ही जोडी पुन्हा एकत्र येत असल्यामुळे आणखी एका लक्षात राहणाऱ्या चित्रपटाची अपेक्षा वाढली आहे.

बालाजी मोशन पिक्चर्स (बालाजी टेलिफिल्म्स लिमिटेडचा भाग) आणि केप ऑफ गुड फिल्म्स यांच्या बॅनरखाली बनलेल्या 'भूत बंगला'मध्ये अक्षय कुमार, वामिका गब्बी, परेश रावल, तबू आणि राजपाल यादव महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रियदर्शन यांनी केले असून अक्षय कुमार, शोभा कपूर आणि एकता आर कपूर हे याचे निर्माते आहेत. हा चित्रपट दहा एप्रिल २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार कोण?

**पुणे/प्रतिनिधी :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीची तयारी जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली असून, अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. बारामतीतील तीन लाख ८३ हजार मतदारांना मतदानाचा हक्क बजाविण्याची संधी मिळणार की उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड होणार, याबाबत उत्सुकता असणार आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभा मतदार संघात पोटनिवडणूक घेतली जाणार आहे. त्यासाठी जिल्हा निवडणूक शाखेकडून निवडणुकीची तयारी केली आहे. मतदार यादीचे पुनरीक्षण करण्याचे काम पूर्ण झाले आहे. प्रारुप मतदार यादी नऊ फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात आली. त्यावर हरकती आणि सूचना घेऊन अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार तीन लाख ८३ हजार ७६७ मतदार झाले आहेत.

# खुर्चीवर नाही तर मैदानात उतरलेले नगराध्यक्ष!

## हनुमान नगरातील रस्ता-नाली समस्येवर किशोर गारोळेंची तात्काळ कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** शहरातील नागरी समस्या सोडवण्यासाठी मेहकर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष किशोर गारोळे हे केवळ कार्यालयात बसून आदेश देणारे नव्हे, तर प्रत्यक्ष नागरिकांच्या दारी जाऊन समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी मैदानात उतरलेले नगराध्यक्ष म्हणून पुढे येत आहेत.

मेहकर शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील हनुमान नगर परिसरात रस्ता व नालीच्या समस्येबाबत नागरिकांनी तक्रार केल्यानंतर नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी प्रभागाचे नगरसेवक वैभव उमाळकर तसेच संबंधित अधिकारी-





कर्मचारी उपस्थित होते.

परिसरातील नालीचे पाणी साचल्यामुळे नागरिकांना घाण पाण्याचा त्रास सहन करावा लागत असल्याचे पाहणीदरम्यान निदर्शनास आले. यावर नगराध्यक्ष गारोळे यांनी तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश देत साचलेल्या पाण्याची विल्हेवाट लावण्याचे काम त्वरित सुरू करण्यास सांगितले. तसेच रस्त्याच्या समस्येबाबतही आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित विभागाला देण्यात आले.

उर्वरित समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्यात येतील, असे आश्वासनही त्यांनी नागरिकांना दिले. फक्त खुर्चीवर बसून कारभार करणारे नव्हे, तर प्रत्यक्ष जमिनीवर उतरून नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर तात्काळ निर्णय घेणारे नगराध्यक्ष म्हणून किशोर गारोळे यांची ओळख निर्माण होत असल्याचे नागरिकांनी यावेळी सांगितले.

नगराध्यक्ष स्वतः घटनास्थळी येऊन समस्या जाणून घेत असल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. तसेच शहरात विकासकामांना वेग मिळत असल्याचे सांगत नागरिकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी नगरसेवक नितीन तुपे, नगरसेवक पती निसान अन्सारी तसेच नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.